


## Impressions of Mr. Navnath Shinde about Precision Sangeet Mahotsava 2017

THURSDAY, MARCH 9, 2017

आदरणीय प्रिसिजन ग्रुप,

नमस्कार !

दि. ४ आणि ५ मार्च २०१७ हे आमच्या आयुष्यातील अविस्मरणीय दिवस ठरले.

संगीत क्षेत्रातील दिग्गज मंडळींना आमंत्रीत करून आपण सोलापूरकरांना संगीताची मेजवानी दिलीत. त्याबद्दल आपलं आणि आपल्या कल्पनांचं, नेटक्या नियोजनाचं कौतुक करावं तेवढं कमीच आहे.

आमच्यासारख्या ग्रामीण भागातील रसिकांसाठी असे कार्यक्रम म्हणजे जीवनातील आनंदाचा एक परमोच्च क्षण..

हा आनंद दिल्याबद्दल डॉ. सुहासिनी, यतिनजी आणि ज्यांचा आवाज ऐकला की आम्हाला 'व.पुं.'चं स्मरण होतं असं हजरजबाबी व्यक्तिमत्त्व माधवजी त्याचप्रमाणे सर्व उत्साही 'टीम प्रिसिजन'ला धन्यवाद !

नवनाथ शिंदे, अरण